खे. ता. शि. प्र. मंडळाचे

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

ता. खेड, जि. पुणे. 410505

# भूगोल विभाग

# गाव सर्वेक्षण अहवाल

## मौजे गुळाणी
## ता. खेड, जि. पुणे

सर्वेक्षक

एस . वाय. बी. ए. विद्यार्थी

मार्गदर्शक

प्रा. डॉ. दिलीप मुळूक

प्रा. डॉ. डी.एम.मारकड

प्रा. एम.एल. मुळूक

**2022 – 2023**

**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

**ता. खेड, जि. पुणे. 410505**

# भूगोल विभाग

## सन २०२२ – २०२३

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु./कुमारी

-------------------------------------------------------------------------------

रोल नंबर ---- ------------परिक्षा क्रमांक -----------------------हयाने /हिने एस. वाय. बी. ए. या वर्गामध्येमध्ये सन 2022- 2023 या शैक्षणिक वर्षात भूगोल या विषया अंतर्गत ग्रामसर्वेक्षण अहवाल ( मौजे गुळाणी ता. खेड (राजगुरुनगर), जि. पुणे ) मध्ये सहभागी होऊन ग्रामसर्वेक्षणाचे प्रात्यक्षिक काम समाधानपुर्वक पुर्ण केले आहे.

डॉ. डी. एम. मारकड
(समन्वयक)

प्रा. दिलीप मुळूक
(भूगोल विभाग प्रमुख)

# ऋणनिर्देश

पुणे विद्यापीठाच्या कलाशाखे अंतर्गत विशेष स्तरवर भूगोल या विषया अंतर्गत प्रात्यक्षिक कामकाज तयार करणे अनिवार्य आहे.

शैक्षणिक वर्ष भूगोल या विभागातील सन 2022 - 2023 या कालावधीत भूगोल विषयावर प्रात्यक्षिक कार्यावर वृत्तांत तयार करणे यामध्ये ग्रामसर्वेक्षण हा विषय निवडला असून मौजे गुळाणी, ता. खेड (राजगुरुनगर), जि. पुणे या ठिकाणी जावून भेट दिली. यावरून निरिक्षण करून हा ग्रामसर्वेक्षण वृत्तांत तयार केला आहे.

प्राचार्य. डॉ. शिरीष पिंगळे आणि उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी आम्हाला ग्रामसर्वेक्षणास जाण्यास परवानगी दिली. तसेच आम्हाला ग्रामसर्वेक्षणास जाण्यास प्रोत्साहित केले त्याबद्दल आम्ही सर्व त्यांचे आभारी आहोत.

हा ग्रामसर्वेक्षण वृत्तांत तयार करण्यासाठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिलीप मुळूक, तसेच प्रा. डी. एम. मारकड, आणि प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी आम्हाला मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांचे आभारी आहे. तसेच हा ग्रामसर्वेक्षण वृत्तांत तयार करण्यासाठी ग्रंथालय प्रमुख प्रा. तापकिर मॅडम व त्यांचे सहकारी यांनी वृत्तांता संदर्भातील पुस्तके उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी त्यांचे आभारी आहे . तसेच त्या गावचे सरपंच उपसरपंच व गावातील नागरीक यांनी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी मनापासून आभारी आहे.

त्याचप्रमाणे माझया सर्व मित्रमैत्रिणींनी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

भूगोल विभागाचे शतषः आम्ही सर्वजण आभारी आहोत.

-----------------------------------------------------

**विद्यार्थ्याचे नाव व सही**

# अनुक्रमणिका


| प्रकरण पहिले – गाव सर्वेक्षण स्वरूप | | |
|---|---|---|
| अनुक्रम | घटक | पृष्ठ क्रमांक |
| प्रकरण पहिले – गाव सर्वेक्षण स्वरूप | | |
| 1.1 | प्रस्तावना - | 1 |
| 1.2 | अभ्यासाची ध्येय आणि उद्दिष्टे - | 1 |
| 1.3 | अभ्यास पद्धती - | 1 |
| प्रकरण दुसरे – अभ्यास क्षेत्राची भौगोलिक पार्श्वभूमी | | |
| 2.1 | अभ्यास क्षेत्र - | 3 |
| 2.2 | भूपृष्ठरचना | 3 |
| 2.3 | जलप्रणाली | 3 |
| 2.4 | मृदा | 4 |
| 2.5 | हवामान, वनस्पती, प्राणी | 4 |
| प्रकरण तिसरे – सामाजिक घटकांचा अभ्यास | | |
| 3.1 | धर्मनिहाय वितरण | 5 |
| 3.2 | जातीनिहाय लोकसंख्या | 6 |
| 3.3 | कुटुंब पध्दती | 7 |
| 3.4 | कुंटुंबातील सदस्यांची संख्या | 7 |
| 3.5 | स्त्री पुरूष प्रमाण | 8 |
| 3.5 | वयोगट रचना | 9 |
| 3.6 | साक्षरता आणि शैक्षणिक स्थिती | 10 |
| 3.7 | वैवाहिक स्थिती | 11 |
| 3.8 | निवासाचे स्थान | 11 |
| | | |
| प्रकरण चौथे – आर्थिक घटक | | |
| 4.1 | कुंटूंबाचा प्रमुख व्यवसाय | 13 |
| 4.2 | व्यावसायिक रचना | 14 |
| 4.3 | स्थलांतर | 15 |
| 4.4 | नोकरीचा प्रकार | 15 |
| 4.5 | मालकी हक्काच्या जमिन | 16 |
| 4.6 | मालकी हक्काच्या जमिन (एकरमध्ये) | 17 |
| 4.7 | जलसिंचनाची स्थिती | 18 |
| 4.8 | जलसिंचन सुविधा प्रकार | 18 |
| 4.9 | पीकरचना | 19 |
| 4.10 | बागायती आणि भाजीपाल्याची पिके | 20 |

| | | |
|---|---|---|
| 4.11 | वार्षिक उत्पन्न | 22 |
| 4.12 | आहाराची स्थिती | 23 |
| 4.13 | आहारातील पदार्थ | 23 |
| **प्रकरण पाचवे – निवास सुविधा** | | |
| 5.1 | घराबाबतची स्थिती | 25 |
| 5.2 | घराच्या भिंतीचे घटक | 26 |
| 5.3 | छप्पर | 26 |
| 5.4 | खोल्यांची संख्या | 27 |
| 5.5 | विजेबाबतची स्थिती | 28 |
| 5.6 | गोठयाबाबतची स्थिती | 28 |
| 5.7 | गोठयाचा प्रकार | 29 |
| 5.8 | गुळाणी गावातील पशुधन | 30 |
| 5.9 | स्नानगृहे | 31 |
| 5.10 | स्वच्छतागृहे | 31 |
| **प्रकरण सहावे – निवास सुविधा** | | |
| 6.1 | पोशाख पध्दती | 32 |
| 6.2 | पाणीपुरवठयाचा स्त्रोत | 33 |
| 6.3 | पाणीपुरवठयाचे घरातील अंतर | 34 |
| 6.4 | इंधनाचा प्रकार | 35 |
| 6.5 | वाहतूकीची साधने | 36 |
| 6.6 | मनोरंजनासाठी साधने | 37 |
| 6.7 | घरगुती उपकरणे साहित्य | 37 |
| 6.8 | इतर उपकरणे | 38 |
| 6.9 | सण समारंभ | 38 |
| 6.10 | यात्रा व उत्सव - | 39 |
| 6.11 | विवाह पद्धती | 39 |
| 6.12 | मंदिरे | 39 |
| 6.13 | वाड्या व वस्त्या | 40 |
| 6.14 | दुकाने | 40 |
| 6.15 | शाळा | 40 |
| 6.16 | रस्ते | 40 |
| 6.17 | गावातील लोकांची आडनावे | 40 |
| **प्रकरण सातवे – निष्कर्ष आणि उपाययोजना** | | **41** |
| **छायाचित्रे** | | **43** |

# प्रकरण पहिले

# गाव सर्वेक्षण स्वरूप

**१.१ प्रस्तावना -**

भारत हा खेड्यांचा देश आहे. भारतामध्ये सहा लाख 40 हजार 867 इतकी खेडी आहेत. भारतातील खेड्यात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण 68.84% आहे. खेड्यामध्ये शेती, पशुपालन हे प्रमुख व्यवसाय चालतात. भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर आधारित आहे. बहुसंख्य शेतकरी हे खेड्यात राहणारे आहेत. त्यामुळे खेड्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. खेडे हे एक देशाचा एक घटक या नात्याने खेड्याचा अभ्यास केला जातो. भूगोलामध्ये खेड्याचा अभ्यास करणे म्हणजे भारताच्या प्राथमिक स्वरूपाचा अभ्यास करणे असे मानले जाते. यामुळे भूगोल विषयांमध्ये खेड्याचा अभ्यास प्रामुख्याने केला जातो. प्रस्तुत या सर्वेक्षणासाठी गुळणी या खेडेगावाचा गावाची निवड केलेली आहे.

**१.2 अभ्यासाची ध्येय आणि उद्दिष्टे -**

१. गुळाणी गावच्या प्राकृतिक रचनेचा अभ्यास करणे.

२. गुळाणी गावच्या हवामानाचा अभ्यास करणे.

३. गुळाणी गावातील व्यवसायांचा अभ्यास करणे.

४. गुळाणी गावातील प्रथा परंपरांचा अभ्यास करणे.

५. गुळाणी गावातील निवास व्यवस्थेचा अभ्यास करणे.

६. गुळाणी गावातील रूढी परंपरांचा अभ्यास करणे.

**१.3 अभ्यास पद्धती -**

गुळाणी गावचा अभ्यास करण्यासाठी खालील अभ्यास पद्धतींचा उपयोग केला .

**१. प्रश्नावली**

गुळाणी गावचा अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची माहिती घेण्यासाठी विस्तृत अशी प्रश्नावली तयार करण्यात आली. ही प्रश्नावली गुळाणीतील लोकांकडून भरून घेण्यात आली. या प्रश्नावलीमध्ये गुळाणीच्या नागरिकांचे, खेड्यातील शेतकऱ्यांच्या वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश टाकणारे प्रश्न विचारण्यात आले होते. या प्रश्नावलीच्या माध्यमातून गुळाणीतील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, व्यावसायिक तसेच वेगवेगळी गृहरचना याविषयी माहिती घेण्यात आली.

**२. मुलाखत**

गुळाणीतील अनेक लोकांच्या मुलाखती घेऊनही अभ्यास करण्यात आला. ढेरंगे आजिची मुलाखत घेतली.

**३. निरीक्षण**

प्रत्यक्ष गुळाणी या गावाला भेट देऊन तेथील परिस्थितीचे निरीक्षण केले. वेगवेगळ्या माध्यमातून फोटोग्राफी केली किंवा फोटो काढले. गुळाणी या भागाचा अभ्यास केला. अशा रीतीने वेगवेगळ्या अभ्यास पद्धतींचा वापर केला

******

# प्रकरण दुसरे

# अभ्यास क्षेत्राची भौगोलिक पार्श्वभूमी

**2.१ अभ्यास क्षेत्र -**

गुळाणी हे गाव पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील महत्त्वाचे गाव आहे. हे गाव खेड तालुक्याच्या पूर्वेस वसलेले आहे. या गावाचे अक्षवृत्तीय स्थान १८.३५ असून रेखावृत्तीय स्थान ७३.८५ अंश इतके आहे. या गावच्या उत्तरेस पारगाव वसलेले आहे. उत्तरेस आंबेगाव तालुका आहे. गुळाणी च्यापूर्वेस वाफगाव हे गाव आहे. गुळाणीच्या पश्चिमेस जरेवाडी हे गाव आहे. तर गुळाणीच्या दक्षिणेस वाकळवाडी गोसासी ही गाव वसलेली आहेत.

**2.2 भूपृष्ठरचना -**

गुळाणी हे गाव सातगाव पठार नावाने ओळखल्या जाणाऱ्या पठारावर वसलेले आहे. या सातगाव पठारावरून वेळ नावाची नदी वाहते. ही नदी गुळाणीच्या उत्तर सीमेवरून वाहत तशीच वाफगावच्या हद्दीत प्रवेश करते. या नदीने गुळाणी व पारगाव यांच्यामधली सीमा तयार केलेली आहे. पठारावर बसले तरी छोटे छोटे डोंगर आणि टेकड्या तिथे पहावयास मिळतात. गुळाणीच्या पश्चिमेकडे जरेवाडीच्या हद्दीमध्ये वाघोबाचा डोंगर नावाचा एक डोंगर आहे. वाघोबाच्या डोंगराची उंची 800 मीटर पेक्षा अधिक आहे. गुळाणी हे गाव समुद्रसपाटीपासून ५९६ मीटर उंचीवर वसलेले आहे. उत्तरेस काही माळ आणि टेकड्या असलेल्या दिसून येतात. तसेच गुळाणी गावच्या पूर्वेस देखील रानुबाईचे डोंगर पिराचा डोंगर आहेत. वाकळवाडीच्या डोंगरावर वाकळवाडी हे गाव वसलेले आहे. गावाच्या पश्चिमेकडे माळांनी तयार झालेली एक खिंड आहे. तेथे देवीचे मंदिर आहे.

**2.3 जलप्रणाली -**

गुळाणी गावातून एक ओढा पश्चिमेकडून पूर्वेकडे गेलेला आहे. या ओढ्याला गुळाणओढा असे म्हणतात. या गुळाण ओढ्याच्या काठीच गुळाणी हे गाव वसलेले आहे. या ओढ्यावर गुळाणीच्या पूर्वेकडे पाचशे मीटर अंतरावर एक तलाव बांधलेला आहे. या तलावात पावसाळ्यात व हिवाळ्यात पाणी असते. या तलावातील पाणी उन्हाळ्यात आटून जाते. हा पाझर तलाव सिंचनासाठी नसून केवळ पाणी पिण्यासाठी आहे. गुळाणी गावच्या उत्तर सीमेवरून वेळ नावाची नदी वाहते. ही नदी आकाराने लहान आहे. ती वेळेश्वराच्या डोंगरात उगम पावते. गुळाणी आणि वाफगावच्या दरम्यान या नदीवर एक तलाव बांधण्यात आलेला आहे. हा तलाव जलसिंचनासाठी देखील महत्त्वाचा आहे.

**2.4 मृदा –**

गुळाणी गावाच्या मध्य भागात काळी कसदार जमीन आहे. गुलानीच्या पश्चिमेस मालाची मुरमाड मृदा आढळते. दक्षिण बाजूला पोगा भागात काळी मृदा आढळते आणि त्यापुढे माळरानाची मुरमाड मृदा आढळते. आग्नेय बाजूसही माळरान आढळते. खळदकर वस्तीच्या बाजूस माळरानावर पांढराट मृदा आढळते. बाकी सर्वत्र काळी मृदा आढळते.

**2.5 हवामान, वनस्पती, प्राणी -**

गुळाणी गावचे हवामान उष्ण आहे. गुळाणी हे उष्णकटिबंधीय शुष्क प्रकारच्या हवामानामध्ये मोडते. गुळाणी भागामध्ये ओढा आणि गावच्या नैऋत्य दिशेस संरक्षक आणि राखीव जंगले असल्याचे दिसून येते. गुळाणीमध्ये उष्णकटिबंधीय शुष्क पानझडी आणि काटेरी प्रकारची वने आढळतात. गुळाणी गावांमध्ये आढळणाऱ्या वृक्षांमध्ये कडुनिंब, बाभळ, चिंच, आवळा, शमी, सौंदड, बोर असे वेगवेगळे वृक्ष आढळतात. या ठिकाणी वेगवेगळया प्रकारचे प्राणी देखील आढळतात. गुळाणी परिसरामध्ये पाळीव आणि जंगली असे दोन्ही प्रकारची प्राणी आढळतात. पाळीव प्राण्यांमध्ये गाय, म्हैस, शेळी, मेंढी, कोंबड्या, कुत्री, मांजर, गाढव या प्रकारचे प्राणी आढळतात. तर जंगली प्राण्यांमध्ये बिबटे, लांडगे, कोल्हे, उदमांजरे, खोकडे, कावळे, चिमण्या, साळींदर, ससे, खारी असे अनेक पक्षी आणि प्राणी आढळतात. गुळाणी परिसरामध्ये वृक्षांचे प्रमाण कमी असल्याने प्राण्यांचेही प्रकार कमी आहेत.

******

# प्रकरण तिसरे

## सामाजिक घटकांचा अभ्यास


भूगोल विषयामध्ये सामाजिक घटकांचाही अभ्यास केला जातो. गुळणी गावाच्या सामाजिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करताना धर्मनिहाय वितरण, जातीनिहाय वितरण, कुटुंब, लिंग गुणोत्तर, वयोगट रचना, साक्षरता, शैक्षणिक स्थिती, वैवाहिक स्थिती यांचा विचार केला आहे.

### 3.१ धर्मनिहाय वितरण

**तक्ता क्र. 1. गुळाणी गावातील विविध धर्मीय लोकसंख्या टक्केवारी**

| अ. नं. | धर्म | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | हिंदू | 97.24 |
| 2 | मुस्लिम | 0.06 |
| 3 | ख्रिश्चन | 00 |
| 4 | बौध्द | 0.02 |
| 5 | जैन | 00 |
| 6 | शिख | 00 |
| 7 | इतर | 00 |
| एकूण | | 100 |

**आलेख क्र. – 1. गुळाणी गावातील विविध धर्मीय लोकसंख्या**




भूगोल विषयामध्ये सामाजिक रचनेचा अभ्यास करत असताना वेगवेगळ्या धर्मांची लोकसंख्या व धार्मिक वितरण यांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. गुळाणी या गावामध्ये हिंदू, मुस्लिम, बौद्ध अशा वेगवेगळ्या धर्मांचे लोक राहतात. विभाजित वर्तुळात दाखविल्याप्रमाणे हिंदू धर्माची लोकसंख्या येथे सर्वात जास्त आहे. ती म्हणजे 97.24 टक्के लोक हिंदू धर्मीय असून 0.06 % लोक मुस्लिम धर्माचे असलेले आढळून आले आहेत. तर केवळ 0.02% लोक बौद्ध धर्माचे असल्याचे आढळून आले आहे. गुळाणी गावांमध्ये ख्रिश्चन, जैन, शीख आणि इतर धर्माचे लोक आढळून आलेले नाहीत.

### 3.2 जातीनिहाय लोकसंख्या

**तक्ता क्र. 2 गुळाणी गावातील विविध जातीनिहाय लोकसंख्या टक्केवारी**

| अ. नं. | जात | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | OPEN | 80 |
| 2 | OBC | 2.7 |
| 3 | SC | 4.1 |
| 4 | ST | 11.03 |
| 5 | NT | 2.0 |
| | Total | 100 |

**आलेख क्र. – 2. गुळाणी गावातील विविध जातीनिहाय लोकसंख्या**





गुळाणी गावचा अभ्यास करत असताना त्या गावातील वेगवेगळ्या प्रवर्गातील लोकांचाही अभ्यास केलेला आहे. येथे खुल्या वर्गातील लोकसंख्या ही 80% असून ओबीसी वर्गातील लोकसंख्या 2.7% आहे. एस. सी. वर्गातील लोकसंख्येचे प्रमाण 4.1% आढळून आलेले असून एस. टी. आणि एन. टी. या लोकांचे प्रमाण अनुक्रमे 11.03% आणि 2.0% इतके आढळून आले आहे. वरील विभाजित वर्तुळामध्ये हे दर्शविलेली आहे.

### 3.3 कुटुंब पध्दती

**तक्ता क्र. 3. गुळाणी गावातील कुटुंब पध्दती**

| अ. नं. | कुंटूब पध्दती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | एकत्र | 68.96 |
| 2 | विभक्त | 31.03 |

**आलेख क्र. – 3. गुळाणी गावातील कुटुंब पध्दती**





भारतामध्ये दोन प्रकारची कुटुंब पद्धती असलेली आढळून येते. एकत्र कुटुंब पद्धती आणि विभक्त कुटुंब पद्धती. आजही भारतातील अनेक खेड्यांमध्ये एकत्र कुटुंब पद्धतीला प्राधान्य दिले जाते. गुळाणीमध्ये सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांपैकी 68.98% लोक हे एकत्र कुटुंब कुटुंबात असलेले दिसून येतात तर 31.03% लोक हे विभक्त कुटुंबामध्ये आढळून आलेले आहे.

### 3.4 कुंटुंबातील सदस्यांची संख्या

**तक्ता क्र. 4.- गुळाणी गावातील कुंटुंबातील सदस्यांची संख्या**

| अ. नं. | कुंटुबातील सदस्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | 0 - 2 | 4.13 |
| 2 | 3- 4 | 25.51 |
| 3 | 5- 6 | 41.37 |
| 4 | 7-8 | 14.48 |
| 5 | 9-10 | 5.51 |
| 6 | 10+ | 8.96 |
| | **एकूण** | **100** |

**आलेख क्र. – 4. गुळाणी गावातील कुंटुंबातील सदस्यांची संख्या**




गुळाणी या गावामध्ये वेगवेगळया कुटुंबातील सदस्यांची संख्या वेगवेगळी आहे. शून्य ते दोन सदस्य असणाऱ्या कुटुंबांची संख्या 4.13% आहे. तीन ते चार सदस्य असणाऱ्या कुटुंबांची संख्या 25.51% आहे. पाच ते सहा लोक असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 41.37% आहे .आणि ते सर्वात अधिक आहे. सात ते आठ सदस्य असणाऱ्या कुटुंबांची संख्या 14.48% आहे, तर नऊ ते दहा सदस्य संख्या असलेल्या कुटुंबाचे प्रमाण 5.51% आहे. दहा पेक्षा अधिक सदस्य असलेली कुटुंबेही आढळून आलेली आहेत. यांचे प्रमाण 8.96% आहे. वरील स्तंभालेखांमध्ये हे दर्शविलेली आहे.


**3.5 स्त्री पुरूष प्रमाण**

**तक्ता क्र. 5. गुळाणी गावातील स्त्री पुरूष प्रमाण टक्केवारी**

| अ. नं. | स्त्री पुरूष | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | कुंटुंबातील स्त्रियांची एकूण संख्या | 47.46 |
| 2 | कुंटुंबातील पुरूषांची एकूण संख्या | 52.28 |

भूगोल विषयांमध्ये लोकसंख्येचा अभ्यास करत असताना स्त्रियांची आणि पुरुषांची संख्या किंवा प्रमाण याला अतिशय महत्त्व असते. गुळाणीतील स्त्रियांचे प्रमाण हे 47.46% असून पुरुषांचे प्रमाण हे 52.28% आहे. वरील वर्तुळालेखामध्ये हे दर्शविलेले आहे.

**आलेख क्र. – 5. स्त्री पुरूष प्रमाण**





### 3.6 वयोगट रचना

**तक्ता क्र. 6 गुळाणी गावातील वयोगट रचना**

| अ. नं. | वयोगट रचना | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | 14 पेक्षा कमी वय | 12.89 |
| 2 | 15-59 | 72.28 |
| 3 | 60 पेक्षा जास्त | 14.81 |

**आलेख क्र. – 6. गुळाणी गावातील वयोगट रचना**




लोकसंख्या भूगोलामध्ये वयोगट रचनेचा अभ्यास देखील महत्त्वाचा असतो. गुळाणीमध्ये 15 ते 59 या वर्षाच्या दरम्यान वय असलेल्या लोकांचे प्रमाण सर्वात अधिक असून ते 72.28% आहे. चौदापेक्षा कमी वय असलेल्या लोकांचे प्रमाण 12.89% असून साठपेक्षा जास्त वय असलेल्या लोकांचे प्रमाण 14.81% आहे.

### 3.7 साक्षरता आणि शैक्षणिक स्थिती

**तक्ता क्र. 7. - गुळाणी गावातील साक्षरता आणि शैक्षणिक स्थिती**

| अ. नं. | साक्षरता आणि शैक्षणिक स्थिती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | कुंटूंबातील निरक्षर | 20.24 |
| 2 | पहिली ते पाचवी पर्यंत शिक्षण असलेल्या सदस्यांची संख्या | 21.68 |
| 3 | सहावी ते दहावी पर्यंत शिक्षण असलेल्या सदस्यांची संख्या | 19.87 |
| 4 | अकरावी ते बारावी | 16.26 |
| 5 | पदवीपर्यंत शिक्षण असलेल्या सदस्यांची संख्या | 12.65 |
| 6 | पदव्युत्तर शिक्षण असलेल्या सदस्यांची संख्या | 5.66 |
| 7 | इतर टेक्नीकल शिक्षण असलेल्या सदस्यांची संख्या | 3.61 |

**आलेख क्र. – 7. गुळाणी गावातील साक्षरता**




लोकसंख्येचा सामाजिक अभ्यास करताना शैक्षणिक स्थितीचा देखील विचार करणे गरजेचे असते. गुळाणीमध्ये 145 कुटुंबांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, गुळाणीमध्ये सुमारे 20.24% लोक हे निरक्षर आहेत. पहिली ते पाचवी पर्यंत शिक्षण घेतलेल्या लोकांचे प्रमाण २१.६८ टक्के आहे. सहावी ते दहावी


19.87 टक्के, अकरावी ते बारावी 16.26 टक्के, पदवीपर्यंत 12.65 टक्के, पदव्युत्तर 5.66 टक्के, इतर टेक्नीकल शिक्षण असलेल्या सदस्यांचे प्रमाण 3.61 टक्के आहे.

### 3.8 वैवाहिक स्थिती

**तक्ता क्र. 8.- गुळाणी गावातील कुंटूंबातील वैवाहिक स्थिती**

| अ. नं. | वैवाहिक स्थिती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | कुंटूबातील विवाहित सदस्यांची संख्या | 54.93 |
| 2 | कुंटूबातील अविवाहित सदस्यांची संख्या | 45.06 |
| | एकूण | 100 |

**आलेख क्र. – 8. गुळाणी गावातील कुंटूबातील वैवाहिक स्थिती**





गुळाणीमध्ये अभ्यास केलेल्या लोकसंख्येपैकी 54.93% लोक हे विवाहित असल्याचे दिसून आलेले आहे तर 45.6% अविवाहित असल्याचे लक्षात आलेले आहे.

### 3.9 निवासाचे स्थान

**तक्ता क्र. 9 - गुळाणी गावातील निवासाचे स्थान**

| अ. नं. | निवासाचे स्थान | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | गावठाण | 67.58 |
| 2 | वाडी | 11.03 |
| 3 | वस्ती | 21.37 |

**आलेख क्र. – 9. गुळाणी गावातील निवासाचे स्थान**




गुळाणीमध्ये गावठाणामध्ये राहणाऱ्या लोकांचे प्रमाण 67.58% असून वाडीमध्ये राहणाऱ्या लोकांचे प्रमाण 11.03% आहे, तर वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांचे प्रमाण 21.37% आढळून आलेली आहे. वरील स्तंभालेखांमध्ये हे दर्शविलेले आहे.

******

# प्रकरण चौथे

# आर्थिक घटक


या प्रकरणामध्ये गुळणी गावातील आर्थिक घटकांचा अभ्यास केलेला आहे. आर्थिक घटकांमध्ये गुलानीतील व्यवसाय कुटुंब प्रमुखांचे व्यवसाय, व्यावसायिक रचना, नोकरीसाठी स्थलांतर, नोकरीचा प्रकार, मालकी हक्काची जमीन, जलसिंचन, जलसिंचन सुविधा, पीक रचना, बागायती पिके, वार्षिक उत्पन्न यांचा विचार केलेला आहे.

### 4.१ कुंटूंबाचा प्रमुख व्यवसाय

**तक्ता क्र. 10. - गुळाणी गावातील कुंटूंबातील कुंटूंबाचा प्रमुख व्यवसाय**

| अ. नं. | कुंटूंबाचा प्रमुख व्यवसाय | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | शेती | 68.88 |
| 2 | शेतमजूरी | 4.44 |
| 3 | पशूपालन | 7.22 |
| 4 | मासेमारी | 0.5 |
| 5 | उद्योग | 8.88 |
| 6 | व्यापार | 2.22 |
| 7 | नोकरी | 7.77 |

**आलेख क्र. – 10. गुळाणी गावातील कुंटूंबातील कुंटूंबाचा प्रमुख व्यवसाय**




वरील स्तंभालेखावरून आपल्या असे लक्षात येते की, गुळाणी गावातील लोकसंख्येपैकी शेती करणारी लोकसंख्या सर्वात अधिक असून तिचे प्रमाण 68.88% आहे. शेतमजुरी करणाऱ्या लोकांचे प्रमाण 4.44% असून पशुपालन करणारे 7.22%, मासेमारी करणारे 5.5%, उद्योग करणारे 8.88%, व्यापार करणारे 2.22% आणि नोकरी करणारे 7.77% इतके आढळून आलेले आहेत.

**4.2 व्यावसायिक रचना**

**तक्ता क्र. 11. गुळाणी गावातील लोकसंख्येची व्यावसायिक रचना**

| अ. नं. | व्यवसाय | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | शेती करणारे सदस्य | 41.26 |
| 2 | शेतमजूरी करणा-या सदस्यांची संख्या | 18.38 |
| 3 | पशूपालन करणा-या सदस्यांची संख्या | 19.76 |
| 4 | मासेमारी करणा-या सदस्यांची संख्या | 3.84 |
| 5 | उद्योग करणा-या सदस्यांची संख्या | 2.65 |
| 6 | व्यापार करणा-या सदस्यांची संख्या | 1.82 |
| 7 | नोकरी करणा-या सदस्यांची संख्या | 6.77 |
| 8 | इतर प्राथमिक व्यवसाय करणा-यासदस्यांचीसंख्या | 5.48 |

**आलेख क्र. – 11. गुळाणी गावातील लोकसंख्येची व्यावसायिक रचना**





गुळाणी येथील व्यावसायिक रचनेमध्ये शेती करणे, शेतमजुरी करणे आणि पशुपालन करणे यांचे प्रमाण सर्वात अधिक असून मासेमारी करणारे लोक, उद्योग व व्यापार करणारे लोक कमी असल्याचे आढळून येते.

**4.3 स्थलांतर**

**तक्ता क्र. 12. गुळाणी गावातील नोकरीनिमित्त झालेले स्थलांतर**

| अ. नं. | स्थलांतर | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | स्थलांतर न झालेल्या कुंटूबाची संख्या | 91.03 |
| 2 | स्थलांतर झालेल्या कुंटूबाची संख्या | 8.96 |

**आलेख क्र. – 12. नोकरीनिमित्त झालेले स्थलांतर**




गुळाणीतून बाहेर स्थलांतर करणे केलेल्या लोकांचे प्रमाण कमी आहे. 91.03% लोकांनी गुळाणीतून स्थलांतर केलेले नाही, तर स्थलांतर केलेल्या कुटुंबांची संख्या 8.96% एवढी आहे आणि ती तुलनेने कमी आहे.

**4.3 नोकरीचा प्रकार**


**तक्ता क्र. 13 गुळाणी गावातील नोकरीत असलेल्या लोकसंख्येची स्थिती**

| अ. नं. | नोकरीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | कायम नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्य | 22.70 |
| 2 | तात्पुरत्या नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्य | 6.76 |
| 3 | हंगामी नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्य | 13.04 |
| 4 | सरकारी नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्य | 7.24 |
| 5 | निमसरकारी नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्य | 0.96 |
| 6 | खाजगी नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्य | 14.00 |
| 7 | सहकारी संस्थेत नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्य | 0.96 |
| 8 | स्वत:चा व्यवसाय असणा-या कुंटूबातील सदस्य | 34.29 |

वरील स्तंभालेखांमधून वरून आपल्या लक्षात येते की गुळाणी येथे जे लोक नोकरी करतात या देखील विभिन्नता दिसून येते. स्वत:चा व्यवसाय असणारे लोक हे सर्वात जास्त असून त्यांचे प्रमाण 34.29% दिसून

आले आहे. तर सहकारी संस्थेत नोकरी करणाऱ्या लोकांचे प्रमाण सर्वात कमी असलेली दिसून आलेली आहे. कायम नोकरीत असणाऱ्या लोक नोकरदारांचे प्रमाण 22.70% असून तात्पुरत्या स्वरूपात नोकरी करणाऱ्या कुटुंबातील सदस्यांची टक्केवारी 6.76 आहे

**आलेख क्र. – 13. गुळाणी गावातील नोकरीत असलेल्या लोकसंख्येची स्थिती**





### 4. 4 मालकी हक्काच्या जमिन

**तक्ता क्र. 14 गुळाणी गावातील मालकी हक्काच्या जमिनीबाबत स्थिती**

| अ. नं. | मालकी हक्काची जमिन | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | 84.13 |
| 2 | नाही | 15.86 |

**आलेख क्र. – 14. गुळाणी गावातील मालकी हक्काच्या जमिनीबाबत स्थिती**




जमिनीबाबतची मालकी गुळाणी गावातील बहुतेक नागरिक हे शेतकरी असल्याने सुमारे 84.13% लोकांची स्वतःची जमीन आहे, तर 15.86% लोक हे भूमीहीन असल्याचे आढळून आलेले आहे.

**4.5 मालकी हक्काच्या जमिन (एकरमध्ये)**

**तक्ता क्र. 15. मालकी हक्काच्या जमिनीबाबत स्थिती (एकरमध्ये**

| अ. नं. | स्वतःच्या मालकी हक्काची अंदाजे जमिनी | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | एक एकरपेक्षा कमी | 29.65 |
| 2 | 1 ते 2 एकर | 28.27 |
| 3 | 3 ते 5 एकर | 24.13 |
| 4 | 5 एकरपेक्षा जास्त | 17.93 |

**आलेख क्र. – 15. मालकी हक्काच्या जमिनीबाबत स्थिती (एकरमध्ये**





जमिनीच्या आकारावरून गुळाणीतील शेतकऱ्यांचे वेगवेगळे प्रकार पडतात. एक एकर पेक्षा कमी जमीन असलेले लोक 29.65% असून एक ते दोन एकर क्षेत्र असलेले लोक 28.27% आहेत. तीन ते पाच एकर क्षेत्र असलेले 24.13% लोक असून पाच पेक्षा जास्त एकर असणारे शेतकरी 17 ते 93 टक्के आहेत.

**4.6 जलसिंचनाची स्थिती**

**तक्ता क्र. 16. गुळाणी गावातील जलसिंचनाची स्थिती**

| अ. नं. | जलसिंचन उपलब्धता | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | 37.24 |
| 2 | नाही | 62.75 |

**आलेख क्र. – 16. गुळाणी गावातील जलसिंचनाची स्थिती**




गुळाणी हे गाव जलसिंचनाच्या बाबतीमध्ये जिरायत असणारे गाव आहे गुळाणी गावामध्ये बहुतांश शेतकरी हे जिरायत असून 62.75% लोकांकडे जमिनीच्या जलसिंचनाची सुविधा नाही तर 37.24% लोकांकडे जलसिंचनाची सुविधा आहे


**4.7 जलसिंचन सुविधा प्रकार**

**तक्ता क्र. 17. गुळाणी गावातील उपलब्ध जलसिंचन सुविधा प्रकार**

| अ. नं. | जलसिंचनाचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | विहीर | 58.22 |
| 2 | तलाव | 6.96 |
| 3 | कालवा | 1.26 |
| 4 | बोरवेल | 0.63 |
| 5 | नदी | 0.63 |
| 6 | इतर | 32.27 |

गुळाणी गावातील उपलब्ध जलसिंचन सुविधांच्या प्रकारानुसार विहिरीद्वारे होणारी जलसिंचन सर्वात अधिक असून ते 58.22% आहे. तलावाद्वारे 6.96%, कालव्याद्वारे 1.26%, बोरवेल द्वारे 0. 63%, नदीद्वारे 0.63%, व इतर साधनांद्वारे 32.27% एवढे जलसिंचन झाल्याचे दिसून येते. आडव्या स्तंभालेखामध्ये हे दर्शविलेले आहे.

**आलेख क्र. – 17. गुळाणी गावातील उपलब्ध जलसिंचन सुविधा प्रकार**





**4.8 पीकरचना**

**तक्ता क्र. 18. गुळाणी गावातील पिकरचना**

| अ. नं. | पिकाचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | ज्वारी | 24.44 |
| 2 | बाजरी | 14.42 |
| 3 | भुईमूग | 6.11 |
| 4 | गहू | 5.86 |
| 5 | मका | 5.3 |
| 6 | उडीद | 2.44 |
| 7 | तांदूळ | 2.20 |
| 8 | मूग | 6.35 |
| 9 | हरभरा | 5.37 |
| 10 | मटकी | 0.97 |
| 11 | सोयाबीन | 19.55 |
| 12 | इतर | 6.84 |

गुळाणीमध्ये अनेक प्रकारच्या अन्नधान्याचे उत्पादन घेतले जाते. अन्नधान्यापैकी सर्वात जास्त उत्पादन हे ज्वारी काची घेतले जात असून ज्वारीचे उत्पादन हे 24.44% असल्याचे दिसून येत आहे. बाजरी 14.42 टक्के, सोयाबीन 19.5 टक्के, भुईमूग 6.11 टक्के, गहू 5.86, मूग 6.35 टक्के असल्याचे दिसून येते.

**आलेख क्र. – 18. गुळाणी गावातील पिकरचना**





**4.9 बागायती आणि भाजीपाल्याची पिके**

**तक्ता क्र. 19. गुळाणी गावातील पिकरचना बागायती आणि भाजीपाल्याची पिके**

| **अ. नं.** | **पिकाचे नाव** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| 1 | कांदा | 23.02 |
| 2 | रताळे | 0.63 |
| 3 | बटाटा | 25.55 |
| 4 | वांगी | 4.41 |
| 5 | उस | 0.31 |
| 6 | भेंडी | 4.10 |
| 7 | वेलवर्गीय | 1.89 |
| 8 | मिरची | 5.04 |
| 9 | टोमॅटो | 2.20 |
| 10 | कारली | 1.57 |

| | | |
|---|---|---|
| 11 | काकडी | 0.63 |
| 12 | कोबी | 0.63 |
| 13 | फ्लावर | 0.63 |
| 14 | मेथी | 7.57 |
| 15 | कोंथीबीर | 6.30 |
| 16 | इतर | 15.45 |

**आलेख क्र. – 19. गुळाणी गावातील पिकरचना बागायती आणि भाजीपाल्याची पिके**





बागायती पिकांमध्ये बटाटा या पिकाचे उत्पादन सर्वात अधिक असल्याचे दिसून येते. हे प्रमाण २५.३२ टक्के आहे. त्या पाठोपाठ कांदा या पिकाचा क्रमांक लागतो. एकूण बागायती पिकांमध्ये कांदा या पिकाचे उत्पादन २३.०२ टक्के होते. याशिवाय कोथिंबीर, मेथी, मिरची, वांगी. यांचे उत्पादनही बर्यापैकी होते. या व्यतिरिक्त फ्लावर कोबी, काकडी, कारली, ऊस, रताळे या बागायती पिकांचेही उत्पादन घेतले जाते.

**4.10 वार्षिक उत्पन्न**

**तक्ता क्र. 20. गुळाणी गावातील कुंटुंबांचेअंदाजे एकुण वार्षिक उत्पन्न**

| अ. नं. | अंदाजे एकुण वार्षिक उत्पन्न | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | 10000 पेक्षा कमी | 32.41 |
| 2 | 10000 ते 20000 | 24.82 |
| 3 | 20000 ते 50000 | 23.45 |
| 4 | 50000ते 100000 | 8.96 |
| 5 | 100000 पेक्षा जास्त | 10.34 |

**आलेख क्र. – 20. गुळाणी गावातील कुंटुंबांचेअंदाजे एकुण वार्षिक उत्पन्न**





वार्षिक उत्पन्न गुळाणी हे गाव जिरायत असल्यामुळे तेथील वार्षिक उत्पन्न कमी असल्याचे दिसून येते दहा हजार पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या लोकांची टक्केवारी 62.41% आहे तर एक लाख पेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या लोकांचे प्रमाण 10.34% आहे दहा हजार ते वीस हजार यादरम्यान उत्पन्न असलेल्या लोकांचे प्रमाण 24.82% आहे तर 20000 ते 50 हजार उत्पन्न असलेल्या लोकांचे प्रमाण 23.45% आहे 50 हजार ते एक लाख यादरम्यान उत्पन्न असलेल्या लोकांचे प्रमाण हे सर्वात कमी असून ते 8.96% असल्याचे दिसून येते या स्तंभालेखांमध्ये उत्पन्नानुसार वितरण दर्शविलेली आहे

### 4.11 आहाराची स्थिती

**तक्ता क्र. 21. गुळाणी गावातील कुंटुंबांचेअंदाजे एकुण वार्षिक उत्पन्न**

| अ. नं. | आहाराचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | कुटूंबातील शाकाहारी लोकांची संख्या | 43.63 |
| 2 | कुटूंबातील मिश्रहारी लोकांची संख्या | 56.36 |

**आलेख क्र. – 21. गुळाणी गावातील कुंटुंबांचेअंदाजे एकुण वार्षिक उत्पन्न**





गुळाणी गावातील आहाराच्या स्थितीचा विचार करता गुळाणी मध्ये शाकाहारी लोकांचे प्रमाण हे 43.63% आहे तर मिश्राहरी म्हणजेच शाकाहार व मांसाहार दोन्ही प्रकारचा आहार घेणाऱ्या लोकांची संख्या ही 54.36% इतकी असल्याचे दिसून येते.

### 4.१२ आहारातील पदार्थ

**तक्ता क्र. 22. गुळाणी गावातील आहारातील पदार्थ**

| अ. नं. | पदार्थ | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | ज्वारीची भाकरी | 14.32 |
| 2 | बाजरीची भाकरी | 17.90 |
| 3 | तांदूळ | 13.36 |
| 4 | चपाती /पोळी | 16.39 |
| 5 | भाजी | 13.36 |
| 6 | दूध | 11.29 |
| 7 | मांस/मासे | 4.54 |
| 8 | अंडी | 3.71 |
| 9 | इतर | 5.09 |

**आलेख क्र. – 22. गुळाणी गावातील आहारातील पदार्थ**




गावातील लोकांच्या आहारामध्ये सर्वात जास्त बाजरीच्या भाकरी आणि भाजी यांचे प्रमाण असल्याचे दिसून येते. बाजरीच्या भाकरीचे प्रमाण हे अधिक असल्याचे दिसून येते. बाजरीच्या भाकरी खाणारे 17.90% लोक दिसून येतात ज्वारीची भाकरी खाणारे लोक 14.32% आहेत तर चपाती पोळी खाणारे लोक हे 16.39% आहेत. दूध खाणारे 11.29%, अंडी खाणारे 3.11%, तर मांस आणि मासे खाणारे 4.54% लोक असल्याचे दिसून येत आहेत आहारामध्ये वेगवेगळ्या प्रकारचा उपयोग केला जातो.

******

# प्रकरण पाचवे

# निवास सुविधा


या प्रकरणामध्ये गुलानी गावातील निवास सुधांचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये घरांचा प्रकार, स्वतःच्या हक्काची घरे, घरांच्या भिंतींचे आणि छताचे प्रकार, विजेची स्थिती, गोठ्यांचे प्रकार, स्नान गृहे, स्वच्छता गृहे यांचा विचार केलेला आहे.

## 5.१ घराबाबतची स्थिती

**तक्ता क्र. 23. गुळाणी गावातील मालकी हक्काच्या घराबाबतची स्थिती**

| अ. नं. | घराबाबतची स्थिती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | 97.93 |
| 2 | नाही | 2.07 |

**आलेख क्र. – 23. गुळाणी गावातील मालकी हक्काच्या घराबाबतची स्थिती)**





गुळाणी मध्ये स्वतःच्या मालकी हक्काची खरी असणाऱ्या कुटुंबांची संख्या 97.93% आहे. अर्थातच टी अधिक आहे. स्वतःचे घर नसणाऱ्या लोकांचे प्रमाण नगण्य म्हणजे २.०७ टक्के आहे.

### 5.2 घराच्या भिंतीचे घटक

**तक्ता क्र. 24. गुळाणी गावातील मालकी हक्काच्या घराबाबतची स्थिती**

| अ. नं. | भिंतीसाठी उपयोगात आणलेले साहित्य | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | गवताचे | 3.81 |
| 2 | कच्च्याविटा | 27.27 |
| 3 | डबर | 4.10 |
| 4 | तोड | 3.51 |
| 5 | भाजक्या विटा | 27.27 |
| 6 | सिंमेट | 34.01 |

**आलेख क्र. – 24. गुळाणी गावातील मालकी हक्काच्या घराबाबतची स्थिती**





वरील पिरामिड आलेखावरून आपल्या लक्षात येते की घरांच्या भिंतींच्या बांधकामासाठी सिमेंट आणि भाजक्या विटांचा वापर सर्वात अधिक झालेला आहे. त्यानंतर कच्च्या विटांचा क्रमांक लागतो. डबर तोडी आणि गवत यांचा वापर कमी प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

### 5.3 छप्पर –

**तक्ता क्र. 25. गुळाणी गावातील घराच्या छप्पर बांधकामासाठी उपयोगात आलेले घटक**

| अ. नं. | छप्पर | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | गवत | **5.74** |
| 2 | गावरान कौले | **14.35** |
| 3 | विलायती कौले | **9.09** |
| 4 | पत्र्याचे | **48.80** |
| 5 | प्लास्टिक कागद | **3.82** |
| 6 | सिमेंटचे स्लॅब | **18.18** |

**आलेख क्र. – 25. गुळाणी गावातील घराच्या छप्पर बांधकामासाठी उपयोगात आलेले घटक**





वरील स्तम्भालेखावरून लक्षात येते की, पत्र्याचे छत असणारी घरे सर्वात जास्त आहेत आणि त्यांचे प्रमाण ४८.८०टक्के आहे. त्यानंतर सिमेंटच्या स्लबचा क्रमांक लागतो. त्यांचे प्रमाण १८.१८ टक्के आहे. त्यानंतर गावरान कौले, विलायती कौले, गवत, प्लास्टिक कागद यांचाही काही प्रमाणात वापर केला जातो.

### 5.4 खोल्यांची संख्या

**तक्ता क्र. 26. गुळाणी गावातील घरनिहाय खोल्यांची एकूण संख्या**

| अ. नं. | खोल्यांची एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | 0 -1 | 6.20 |
| 2 | 2 -3 | 68.96 |
| 3 | 4 – 5 | 18.62 |
| 4 | 6 + | 6.20 |

**आलेख क्र. – 26. गुळाणी गावातील घरनिहाय खोल्यांची एकूण संख्या**




वरील स्तम्भालेखावरून लक्षात येते की, 2 ते 3 खोल्या असणारी घरे सर्वात अधिक असून त्यांचे प्रमाण ६८.९६ टक्के आहे. 4 ते 5 खोल्या असणारी घरे १८.६२ टक्के आहेत. 6 पेक्षा अधिक आणि १ पेक्षा कमी खोल्या असणारी घरे कमी आहेत.

### 5.4 विजेबाबतची स्थिती

**तक्ता क्र. 27. गुळाणी गावातील घरनिहाय विजेबाबतची स्थिती**

| अ. नं. | विजेबाबतची स्थिती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | 99.31 |
| 2 | नाही | 0.7 |

**आलेख क्र. – 27. गुळाणी गावातील घरनिहाय विजेबाबतची स्थिती**





गुळाणी गावातील 145 कुटुंबातील वीजेबाबत विचार करता 99 .31 टक्के घरांमध्ये वीज असलेली आढळून आली आहे. तर केवळ 0.7% घरांमध्ये वीज नसलेली दिसून आलेली आहे. याचा अर्थ अलीकडे खेडेगावामध्ये विजेचे सार्वत्रिकरण आणि सर्वत्र प्रसार झाल्याचा दिसून येतो.

### 5.5 गोठयाबाबतची स्थिती

**तक्ता क्र. 28. गुळाणी गावातील घरनिहाय विजेबाबतची स्थिती**

| अ. नं. | गोठयाबाबतची स्थिती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | 59.31 |
| 2 | नाही | 40.68 |

**आलेख क्र. – 28. गुळाणी गावातील घरनिहाय विजेबाबतची स्थिती**





गुळाणी हे कृषी आधारित अर्थव्यवस्था असणारे गाव असल्याने येथे शेतीबरोबरच पशुपालन ही मोठ्या प्रमाणात केली जाते पशुंसाठी गोठा असणाऱ्या कुटुंबांची संख्या 60.31 असल्याची दिसून आली तर गोठा नसणाऱ्या कुटुंबांची संख्या कुटुंबाचे प्रमाण 140.68% असल्याचे दिसून आलेले आहे

**5.5 गोठयाचा प्रकार**

**तक्ता क्र. 29. गुळाणी गावातील गोठयाचा प्रकार**

| अ. नं. | गोठयाचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | गवताचा गोठा | 11.17 |
| 2 | पत्र्याचे शेड | 37.05 |
| 3 | सिमेंटचे शेड | 8.82 |
| 4 | खुराडे | 4.70 |
| 5 | इतर | 38.23 |

**आलेख क्र. – 29. गुळाणी गावातील गोठयाचा प्रकार**




या गोठ्याच्या प्रकारामध्ये पत्र्याचे शेड असणाऱ्या गोठ्याचे प्रमाण सर्वात अधिक असून ते 37.05% आहे. गवताच्या गोठ्याचे प्रमाण 11.17% असून पत्ना सिमेंटचे शेड असणारे गोठे 8.582% आहेत. तर खुराडे असणारे घरे 8.70% आहे.

**5.6 पशुधन**

**तक्ता क्र. 30. गुळाणी गावातील पशुधन**

| अ. नं. | पाळीव प्राण्यांचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | गाय | 30.09 |
| 2 | बैल | 16.34 |
| 3 | शेळी | 16.82 |
| 4 | मेंढी | 0.32 |
| 5 | कोंबडया | 20.87 |
| 6 | म्हैस | 13.91 |
| 7 | इतर | 1.61 |

**आलेख क्र. – 30. गुळाणी गावातील पशुधन**





वरील वर्तुलेखावरून लक्षात येते की, पाळीव प्राणांमध्ये गाय हा प्राणी सर्वात दिसून आलेला आहे. गायेचे प्रमाण ३०.०९ टक्के आहे. यानंतर कोंबड्यांचा क्रमांक लागतो. बैल आणि शेळी यांचे प्रमाण १६ टक्के आहे. म्हीशींचे प्रमाण १३.९१ टक्के आहे. मेंढी आणि इतर प्राण्यांचे प्रमाण नगण्य आहे.

### 5.7 स्नानगृहे

**तक्ता क्र. 31. गुळाणी गावातील स्नानगृहाबाबतीची स्थिती**

| अ. नं. | स्नानगृहाची उपलब्धता | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | 96.55 |
| 2 | नाही | 3.44 |

**आलेख क्र. – 31. गुळाणी गावातील स्नानगृहाबाबतीची स्थिती**




अलीकडच्या काळात शहरातील अनेक सुविधा खेडेगावांमध्ये ही दिसून येत आहेत. गुळाणी गावांमध्ये स्नानगृहाबाबतची स्थिती पाहता 96.55% घरांमध्ये स्नानगृह असल्याचे आढळून आले आहे तर केवळ 3.44% घरांमध्ये स्नानगृह दिसून आलेले नाही.

### 5.8 स्वच्छतागृहे

**तक्ता क्र. 32. गुळाणी गावातील स्वच्छतागृहाबाबतीची स्थिती**

| अ. नं. | स्वच्छतागृहाची उपलब्धता | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | 96.55 |
| 2 | नाही | 3.44 |

स्वच्छतागृहाच्या बाबतीतही तीच स्थिती आहे 96.55% घरांमध्ये शौचालय असलेली दिसून आली तर केवळ 3.44% घरांमध्ये शौचालय दिसून आली नाहीत.

# प्रकरण सहावे

# सांस्कृतिक घटक


गाव सर्वेक्षणामध्ये सांस्कृतिक घटकही महत्त्वाचे असतात. सांस्कृतिक घटका एक व्यापक विषय आहे. सांस्कृतिक घटकांमध्ये सर्व प्रकारच्या मानवनिर्मित घटकांचा समावेश होतो. मानवनिर्मित घटकांमध्ये दोन प्रकार आहेत. एक मूर्त घटक व दुसरे अमूर्त घटक. मूर्त घटकांमध्ये शेती, व्यापार, उद्योग, अर्थव्यवस्था, व्यवसाय, वसाहती, खेडी, शहरे, कारखाने, दळणवळण अशा वेगवेगळ्या गोष्टींचा समावेश होतो. अमूर्त घटकांमध्ये भाषा, धर्म, रूढी, परंपरा, चालीरीती, सण समारंभ जातीप्रथा, वेशभूषा, केशभूषा अशा गोष्टींचा समावेश होतो.

## 6.1. पोशाख पध्दती

**तक्ता क्र. 33. गुळाणी गावातील पोशाख पध्दती**

| अ. नं. | पोशाखाचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | नउवारी साडी | 13.30 |
| 2 | सहावारी साडी | 23.58 |
| 3 | पायजमा शर्ट | 12.70 |
| 4 | सदरा/धोतर | 8.26 |
| 5 | पॅंट/शर्ट | 25.60 |
| 6 | सलवार कुर्ता | 11.29 |
| 7 | इतर | 5.24 |

**आलेख क्र. – 33. गुळाणी गावातील पोशाख पध्दती**




काळानुसार पोशाखामध्ये बदल होत जातो पारंपारिक पोशाखाच्या ऐवजी आधुनिक प्रकारचे वस्त्रे परिधान करण्याकडे कल वाढत जातो. आणि गावांमध्ये सर्वात अधिक वेशभूषा म्हणजेच पॅन्ट शर्ट वापरणाऱ्या लोकांची संख्या सर्वात जास्त असून ती 25.60% आहे. तर धोतर आणि सदरा वापरण्या व वापरणाऱ्या लोकांची संख्या लोकांचे प्रमाण 8.26% आहे. त्यापेक्षा पायजामा आणि शर्ट वापरणाऱ्या लोकांची संख्या अधिक असून ती 12.70% आहे. ऊवारी साडी नेसणाऱ्या महिलांची संख्या 13.30% असून सहावारी साडी नेसणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण 23.58% दिसून आले आहे, तर सलवार कुर्ता वापरणाऱ्या लोकांचेही प्रमाण 11.29% आहे. पूर्वीच्या काळी नऊवारी साडी आणि सदरात उत्तर वापरणाऱ्या लोकांची संख्या खेडेगावामध्ये अधिक असे अलीकडे याच्यामध्ये तीव्रतेने बदल होत आहे. असे दिसून येत आहे खालील स्तंभालेखामध्ये पोशाखाचे प्रकार दर्शवलेले आहेत.

**6.2 पाणीपुरवठयाचा स्त्रोत –**

**तक्ता क्र. 34. पाणीपुरवठयाचा स्त्रोत**

| अ. नं. | पाणीपुरवठयाचा स्त्रोत | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | विहीर | 48.54 |
| 2 | नळ | 30.9 |
| 3 | नदी | 2.91 |
| 4 | कुपनलिका/बोरवेल | 4.85 |
| 5 | तलाव | 3.39 |
| 6 | इतर | 9.70 |

**आलेख क्र. – 34. पाणीपुरवठयाचा स्त्रोत**




प्रत्येक गावामध्ये पिण्यासाठी पाणीपुरवठ्याच्या सोयी केलेल्या असतात. काही सोयी वैयक्तिक स्वरूपात असतात तर काही सोयी शासनाने आणि ग्रामपंचायतीने केलेले असतात. गुळाणी गावांमध्ये सर्वात अधिक पाण्याचा स्रोत म्हणून विहिरीचा वापर केला जातो. 48.54% लोक विहिरीतील पाण्याचा पिण्यासाठी उपयोग करतात. त्या पाठोपाठ नळाचा वापर करणाऱ्या लोकांचे प्रमाण 30.9% आहे. गुळाणी गावामध्ये नदीचे अस्तित्व फारशे नाही. तरीही वेळ नावाची छोटी नदी जवळून गेलेली आहे. त्या नदीतील पाण्याचा पिण्यासाठी वापर करणाऱ्या लोकांचे प्रमाण नगन्या असून ते 2.51% आहे. तर कुपनलिकाचा वापर करणाऱ्या लोकांचे प्रमाण 4.85% आहे आणि गुळाणी गावाच्या जवळच वाफगाव तलाव आहे. त्या तलावातील पाण्याचं पाण्याचा वापर करणाऱ्या लोकांचे प्रमाण 3.39% आहे या वर्तुळ आलेखामध्ये पिण्याच्या पाण्याचे प्रमाण दर्शविलेली आहे.

### 6.3 पाणीपुरवठयाचे घरातील अंतर

**तक्ता क्र. 35. गुळाणी गावातील पाणीपुरवठयाचे साधन आणि घरातील अंतर**

| अ. नं. | पाणीपुरवठयाचे घरातील अंतर | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | घरामध्येच उपलब्ध | 62.75 |
| 2 | 100 मीटर | 17.24 |
| 3 | 200 मीटर | 4.82 |
| 4 | 300 मीटर | 2.75 |
| 5 | 500 मीटर | 4.82 |
| 6 | 1 किमी | 15.86 |
| 7 | 1 किमी पेक्षा जास्त | 11.72 |

**आलेख क्र. – 35. पाणीपुरवठयाचे साधन आणि घरातील अंतर**




पिण्याच्या पाणीपुरवठाचे साधन आणि घरातील अंतर याचा विचार करता गुळाणी खेडेगाव असले तरी काही आधुनिक सुविधा तेथे उपलब्ध होऊ लागलेले आहेत. सुमारे 62.75 टक्के लोकांच्या घरामध्येच पाणी उपलब्ध आहे. 100 मीटर एवढ्या अंतरावरून पाणी आणणाऱ्या लोकांचे प्रमाण 17.24% आहे. 200 मीटर वरून पाणी आणणारी 4.82%, 300 मीटर वरून आणणारे 2.75 टक्के 500 मीटर वरून आणणारी 4.82% तर एक किलोमीटर अंतरावरून पाणी आणणाऱ्या लोकांचे प्रमाण 15.86% तर एक किमी पेक्षा जास्त अंतरावरून पाणी आणणाऱ्या लोकांचे प्रमाण 11.72% असल्याचे दिसून येते या स्तंभालेखामध्ये पाण्याच्या स्रोताचे अंतर दर्शविलेली आहे.

**6.4 इंधनाचा प्रकार**

**तक्ता क्र. 36. गुळाणी गावातील स्वंयपाकासाठीवापरण्यात येणा-या इंधनाचा प्रकार**

| अ. नं. | इंधनाचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | लाकूड | 22 |
| 2 | गोव-या | 18.62 |
| 3 | गोबर गॅस | 5.51 |
| 4 | एलपीजीगॅस | 36.55 |
| 5 | रॉकेल | 5.86 |
| 6 | विद्युत उपकरणे | 3.79 |
| 7 | इतर | 7.58 |

**आलेख क्र. – 36. स्वंयपाकासाठीवापरण्यात येणा-या इंधनाचा प्रकार**



इंधनाचा प्रकार पूर्वीच्या काळी खेडेगावांमध्ये पारंपारिक इंधन प्रकाराचा वापर केला जात असे. जसे की लाख गोवर्या वगैरे परंतु अलीकडच्या काळामध्ये एलपीजी गॅसचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाल्यामुळे गुळाणी गावांमध्ये एलपीजी गॅस वापरणाऱ्या कुटुंबांची संख्या प्रमाण 36.55% दिसून आले आहे. या पाठोपाठ गोवऱ्या वापरणाऱ्या लोकांचे प्रमाण 18.62% लाकूड वापरणाऱ्या लोकांचे प्रमाण 22 टक्के रॉकेट वापरण्यात लोकांचे प्रमाण 5.86% गोबर गॅस वापरणाऱ्या लोकांचे प्रमाण 5.51% तर इतर विद्युत शेगडी वापरणाऱ्या लोकांचे प्रमाण ३.७९ टक्के दिसून आलेले आहे. या व्यतिरिक्त इतर इंधनांचा वापर करणारे लोकांचे प्रमाण 7.58% दिसून आले आहे.

### 6.5 वाहतुकीची साधने

**तक्ता क्र. 37. गुळाणी गावातील घरनिहाय उपलब्ध वाहतूकीची साधने**

| अ. नं. | वाहतूकीच्या साधनांचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | सायकल | 23.97 |
| 2 | दुचाकी | 47.56 |
| 3 | कार | 8.98 |
| 4 | ट्रक | 1.87 |
| 5 | टेम्पो | 3.37 |
| 6 | ट्रॅक्टर | 11.23 |
| 7 | जेसीबी | 00 |
| 8 | बैलगाडी | 2.99 |

वाहतुकीची साधने प्राचीन काळी खेडेगावात प्रामुख्याने बैलगाडीचा वाहतुकीची साधन म्हणून वापर केला जात असे. अलीकडच्या काळात बैलगाडीच्या ऐवजी ट्रक टेम्पो दुचाकी सायकली ट्रॅक्टर यांचे प्रमाण वाढताना दिसून येत आहे. वाहतुकीच्या साधनांमध्ये गुळाणी गावांमध्ये सर्वात जास्त वापर दुचाकीचा होतो असे दिसून आले आहे. दुसरीचा वापर करणारे कुटुंबे 47.56% दिसून आलेले आहेत. या पाठोपाठ सायकलचा वापर करणाऱ्या ही कुटुंबांचे प्रमाण 23.7% दिसून आले आहे. गुळाणी गावांमध्ये 11.23% कुटुंबांकडे ट्रॅक्टर असलेला दिसून आला आहे या फोटो पाठव असलेल्या कुटुंबांचे प्रमाण 8.98% आहे तर टेम्पो असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण 3.37% आहे तर असलेली कुटुंबे कमी असून ती केवळ 1.87% आहेत. सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांपैकी एक आहे कुटुंबामध्ये जेसीबी आढळून आला नाही तर बैलगाडीचे प्रमाण 2.99% दिसून आले आहे खालील पिरॅमिड आलेखामध्ये वाहतुकीची साधने दर्शविलेली आहेत.

**6.6 मनोरंजनासाठी साधने –**

**तक्ता क्र. 38. गुळाणी गावातील घरनिहाय मनोरंजनासाठी उपलब्ध साधने**

| अ. नं. | मनोरंजनाची साधने | टक्केवारी | अ. नं. | मनोरंजनाची साधने | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सीडी प्लेअर | 6.62 | 7 | रेडियो | 3.6 |
| 2 | वीणा | 0.60 | 8 | कॉम्प्यूटर | 2.40 |
| 3 | मोबाईल | 83.72 | 9 | प्रिंटर | 1.2 |
| 4 | टी व्ही | 76.5 | 10 | स्कॅनर | 1.2 |
| 5 | केबल | 8.82 | 11 | लॅपटॉप | 2.40 |
| 6 | डिष | 10.24 | 12 | टेबलेट | 1.8 |

वाढत्या वैज्ञानिक प्रगतीनुसार मनोरंजनाची साधने बदलत गेली. खेड्यांमध्ये देखील हा बदल तीव्रतेने अनुभवास येत आहे. एकविसाव्या शतकामध्ये खेडी झपाट्याने बदलत आहेत. मोबाईलचा शोध हा एक क्रांतिकारी शोध आहे. गुळाणी गावांमध्ये मनोरंजनासाठी मोबाईल, टीव्ही, केबल, डिश, रेडिओ, कॉम्प्युटर, सीडी प्लेयर वगैरे साधनांचा वापर केला जातो. मोबाईलचे प्रमाण सर्वाधिक असून मोबाईलचा वापर मनोरंजनासाठी सर्वाधिक केला जातो. एकूण मनोरंजनाच्या साधनांपैकी सुमारे 41.46% वापर होतो. त्या पाठोपाठ टीव्हीचा वापर 38. 25% इतका होतो. मनोरंजनाची इतरही साधने आहेत.

**6.7 घरगुती उपकरणे साहित्य**

**तक्ता क्र. 39. गुळाणी गावातील घरनिहाय उपलब्ध इतर घरगुती उपकरणे साहित्य**

| अ. नं. | घरगुती उपकरणाचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | इस्त्री | 52 |
| 2 | हिटर | 40 |
| 3 | गॅस | 80 |
| 4 | कपाटे | 73 |
| 5 | खुर्च्या | 62 |
| 6 | टेबल | 35 |
| 7 | सोफासेट | 55 |
| 8 | दिवाण | 65 |
| 9 | शोकेस | 20 |
| 10 | कणीग | 10 |

गुळाणी या गावातील घरनिहाय उपलब्ध घरगुती उपकरणांचा आढावा घेतला असता सर्वात जास्त उपकरणे गॅस ही मिळालेली आहेत. गॅस असणाऱ्या घरांचे प्रमाण 80 टक्के दिसून आले आहे. त्या पाठोपाठ

कपाटे असणाऱ्या घरांचे प्रमाण 73% दिसून आलेले आहे. याबरोबरच दिवाण असणाऱ्या घरांचे प्रमाण 65 टक्के दिसून आले आहे. तर खुर्च्या असणाऱ्या घरांचे प्रमाण 62% दिसून आले आहे. याशिवाय वेगवेगळ्या घरांमध्ये इस्त्री, फिल्टर, टेबल, सोफासेट, शोकेस, कनिंग वगैरे साहित्यही असल्याचे दिसून आले आहे.

**6.8 इतर उपकरणे**

**तक्ता क्र. 40. इतर उपकरणे**

| अ. नं. | इतर उपकरणे | टक्केवारी | अ. नं. | इतर उपकरणे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | खाट | 34.46 | 11 | तिफन | 2.25 |
| 2 | बाज | 4.51 | 12 | पाभर | 4.80 |
| 3 | धुलाईयंत्र | 2.54 | 13 | मळणीयंत्र | 1.35 |
| 4 | शिवणयंत्र | 4.51 | 14 | क्रेन | 0.28 |
| 5 | इंजिन | 3.67 | 15 | रोटर | 4.80 |
| 6 | मोटर | 5.93 | 16 | काकर | 0.84 |
| 7 | नांगर | 12.42 | 17 | सारंगी | 0.28 |
| 8 | औत | 5.64 | 18 | टाकी | 4.23 |
| 9 | ग्रंथ | 4.23 | 19 | मृदंग | 0.56 |
| 10 | पेटी | 1.12 | 20 | कॅमेरा | 0.84 |

वरील आडव्या सुच्यलेखावरून लक्षात याते की ज्या कुटुंबाकडे खात आहे त्या कुटुंबांची संख्या सर्वात अधिक म्हणजे सुमारे 35 टक्के आहे. ज्यांच्याकडे नांगर आहे अश्या कुटुंबांची संख्या १२.४२ टक्के आहे. याशिवाय काही लोकांच्या घरात बाज, धुलाई यंत्र, शिवान यंत्र, इंजिन, मोटार, औत, पेटी, तिफन, पाभर, मळणी यंत्र, क्रेन, रोटर, काकर, सारंगी, टाकी, मृदंग आणि कॅमेरा अशा वस्तू आहेत.

**6.9 सण समारंभ**

महाराष्ट्र राज्यात जे सण साजरे होतात ते बहुतांश सण गुळाणी गावातही साजरे होतात. चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढीपाडवा हा सण साजरा केला जातो. गुढीपाडव्या दिवशी गुढी उभारून नव्या वर्षाची स्वागत केले जाते. चैत्र शुद्ध नवमीला राम जन्मोत्सव साजरा करतात. वैशाख शुद्ध तृतीयेला अक्षय तृतीया साजरी करतात. या दिवशी पितरांच्या नावाने तर्पण केले जाते. जेष्ठ पौर्णिमेस स्त्रिया वटसावित्रीची पूजा करतात. आषाढ शुद्ध एकादशीला येथील लोक उपवास करतात. श्रावण पंचमीला नागपंचमी साजरी करतात. श्रावण पौर्णिमेस बहिणी भावास राख्या बांधतात. श्रावण कृष्ण अष्टमी कृष्ण जन्मोत्सव साजरा करतात. भाद्रपद अमावस्येला बैलपोळा हा

सण साजरा करतात. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत नवरात्रोत्सव साजरा करतात. दशमीला विजयादशमी किंवा दसरा साजरा केला जातो. अश्विन वद्य द्वादशीपासून कार्तिक शुद्ध द्वितीयापर्यंत दीपावली हा सण साजरा केला जातो. कार्तिक शुद्ध द्वादशी पासून पौर्णिमेपर्यंत तुळशीचे लग्न लावतात. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी चंपाषष्ठी म्हणून साजरी करतात. पौष महिन्यातील जानेवारीत 14 किंवा 15 तारखेस मकर संक्रांति साजरी करतात. फाल्गुन महिना शिमग्याचा महिना असतो. फाल्गुन पौर्णिमेस होळी आणि दुसऱ्या दिवशी धुलीवंदन करतात. रंगपंचमीमध्ये रंगाची उधळण केली जाते.

**6.10 यात्रा व उत्सव**

प्रत्येक घरी मुलाचे लग्न झाल्यानंतर खंडोबाचे जागरण केव्हा देवीचा गोंधळ हे कार्यक्रम करतात. हे जागरण गोंधळ खंडोबाचे मंदिरात किंवा घरापुढे करतात. गुळाणी या गावची यात्रा सटवाजी बाबाची यात्रा म्हणून प्रसिद्ध आहे. फाल्गुन वद्य चतुर्दशीस ही यात्रा साजरी होते. या यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये बैलगाडे घाटातून पळवले जातात. आणि इतरही सांस्कृतिक कार्यक्रम होतात. दर वर्षी फाल्गुन वद्य चतुर्दशीला सटवाजी बाबाची मोठी यात्रा भरते. या यात्रेच्या निमित्ताने अनेक सांस्कृतिक गोष्टी होतात. घाटातून बैलगाडे पळवले जातात. तसेच अनेक मल्लांच्या कुस्त्यांचेही आयोजन केले जाते. रात्री मनोरंजनासाठी अनेक प्रकारच्या लावण्या तमाशे यांचेही आयोजन केले जाते.

**6.11 विवाह पद्धती**

महाराष्ट्रातील विवाहप्रमाणे गुळाणी मध्ये विवाह संपन्न होतात. विवाहाच्या अगोदर आपल्या जातीतील सोयरीक शोधली जाते. त्यानंतर विवाह जमवताना हुंडा, विवाह वधू पक्षाने करायचा किंवा वरपक्षाने हे ठरवले जाते. हे ठरल्यानंतर गंधाचा कार्यक्रम होतो. विवाहाची तारीख ठरवतात. विवाहाच्या दिवशी दुपारी बारा वाजता साखरपुडा करतात. नंतर हळद लावली जाते. शक्यतो संध्याकाळी गोरज मुहूर्तावर मंगलाष्टकांच्या गजरामध्ये विवाह संपन्न होतो. नंतर सप्तपदी वगैरे उरकून विवाह केला जातो.

**6.१२ मंदिरे**

गुळाणी येथे पारंपारिक सटवाजी बाबाचे मंदिर आहे. हा सटवाजीबाबा नवसाला पावतो अशी लोकांची श्रद्धा आहे. गुळाण ओढ्याच्या शेजारी काठावर सटवाजी बाबाची मंदिर आहे. ते उत्तरेकडे मुख करून आहे. मंदिर भव्य आणि विशाल आहे. दर महिन्याच्या वद्य चतुर्दशीला गुळाणी येथे एक सटवाजी बाबा ची छोटी यात्रा भरते. याला स्थानिक भाषेत सटवाजी बाबाची चावदस असे म्हणतात. याशिवाय गुळाणी गावामध्ये हनुमान,

शंकर, विठ्ठल रुक्मिणी, मुक्ताबाई, पीर अशी इतरही दैवतांची मंदिरे आहेत. गुळाणी सटवाजीबाबाच्या लगतच एक मोठा सभामंडप आहे. या सभामंडपामध्ये गुळाणी गावातील मोठा अखंड हरिनाम सप्ताह होतो.

**6.१३ वाड्या व वस्त्या**

गुळाणी गावामध्ये अनेक वाड्या व वस्त्या आढळून येतात. आरुडे वस्ती, वडाची वस्ती, राणूबाई वस्ती, पोगा वस्ती, खळदकर वस्ती या महत्त्वाच्या वस्त्या आहेत. याशिवाय गुळाणदरा, आळंदी या नावाची शेती आढळून येतात.

**6.१४ दुकाने**

गुळाणी गावांमध्ये तीन किराणा दुकाने असून तीन हॉटेल आहेत. त्यापैकी एक हॉटेल सटवाजी बाबाच्या मंदिराच्या पाठीमागे रस्त्याच्या बाजूला आहे. तसेच एक कापड दुकानही आहे.

**6.१५ शाळा**

गुळाणी गावांमध्ये मराठी शाळा सातवीपर्यंत आहे. आणि त्यानंतर कैलासवासी बाबुराव पिंगळे पाटील विद्यालय गुळाणी ही दहावीपर्यंतची शाळा आहे.

**6.१६ रस्ते**

गुळाणी गावामध्ये डांबरी रस्ता राजगुरुनगर ते वाफगाव असा जातो. हा रस्ता गुळाणी गावाच्या जवळून जातो. गुळाणी गावातून दक्षिणेकडे वाकळवाडी या गावाला एक रस्ता जातो. गुळाणी गावातून एक रस्ता पश्चिमेकडे जरेवाडी या गावाला जातो. गुलानीतून एक रस्ता पश्चिमेला पारगाव कडे जातो. गावामध्ये सिमेंट रोड आहेत.

**6.१५ गावातील लोकांची आडनावे -**

गुळाणी गावांमध्ये अनेक आडनावाचे लोक राहतात. सोनवणे, शिनगारे, साबळे हे मागासवर्गीय आडनावाचे लोक आहेत. चव्हाण हे न्हावी समाजाचे कुटुंब आहे. भंडलकर रामोशी आहेत तर गाडेकर सुतार आहेत. कडेकर हे गुरव आहेत. याशिवाय इतर मराठा समाजाचे अनेक लोक राहतात. ढेरंगे, पिंगळे, गायकवाड, वायाळ, जरे, जोशी, आरुडे, गुलाणकर, तांबे, मेदगे, खळदकर, पांडे, मांजरे या आडनावाचे लोक राहतात. गुळाणी गावामध्ये सुसज्जासी ग्रामपंचायत कार्यालय आहे. तसेच ग्रामीण आरोग्य केंद्र आहे. इंदुबाई हनुमंत ढेरंगे हे गुळाणीच्या सरपंच आहेत आणि केतन बाळासाहेब तांबे हे गुळाणी गावचे पोलीस पाटील आहेत.

******

# प्रकरण सातवे

# निष्कर्ष

१. गुळाणी गावच्या पश्चिमेकडील भाग डोंगराळ असून गावच्या शिवाराचा उतार पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे

२. पूर्व भागातही ईशान्य दिशेला काही प्रमाणात टेकड्या असलेल्या दिसून येतात

३. गुळाणी गावच्या सरहद्दीवरून वेळ ही नदी पूर्वेकडून पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत गेलेली आहे

४. गुळाणी गावातून ओढा नावाचा प्रवाह वाहतो तो पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतो.

५. गावाच्या पश्चिमेकडील मृदा ही मुरमाड आणि काहीशी नापीक असून पूर्वेकडील आणि ईशान्य कडील मृदा काळी व सुपीक आहे.

६. गुळाणी गावच्या आग्नेय दिशेलाही डोंगर आहेत यांना पिराचे डोंगर आणि आकळवाडीचे डोंगर म्हणतात.

७. गुळाणी गावचे हवामान मोसमी असून येथे सरासरी 55 सेंटीमीटर पाऊस पडतो.

८. गुळाणी परिसरात उष्णकटिबंधीय शुष्क पानझडी व काटेरी वने आढळतात.

९. गुळाणी भागात विविध प्रकारचे पशुपक्षी आढळतात.

१०.गुळाणी गावांमध्ये हिंदू धर्मीय लोकांची संख्या खूपच अधिक असून बौद्ध व इस्लाम धर्म लोकांची संख्या फारच कमी आहे इतर धर्मांचे लोक आढळून येत नाहीत.

११. तरुणांची संख्या अधिक असून बालकांचे व वृद्धांचे प्रमाण कमी आहे.

१२. विवाहित लोकांची संख्या अविवाहित लोकांपेक्षा अधिक आहे.

१३.गुळाणी मध्ये साक्षर लोकांची संख्या निरक्षर लोकांपेक्षा जास्त आहे.

१४. गुळाणी मधून फारच कमी लोकांनी इतरत्र स्थलांतर केलेली आहे.

१५. गुळाणी मध्ये सर्वात जास्त लोक हे शेती व्यवसाय करतात.

१६.गुळाने मध्ये सर्वात जास्त अन्नधान्यांमध्ये ज्वारी या पिकाचे उत्पादन घेतले जाते.

१७. गुळाणीमध्ये बटाटा या व्यापारी पिकाचे उत्पादन सर्वात आधी घेतले जाते.

१८. तरकारी मध्ये कांदा या पिकाचे सर्वात अधिक उत्पादन घेतले जाते.

१९. गुळाणीमध्ये सर्वात अधिक जलसिंचन हे विहिरीच्या माध्यमातून होते

२०.गुळाणीमध्ये सर्वात अधिक वार्षिक उत्पन्न गटामध्य हे लोक येतात.

२१. गुळाणीमध्ये बागायत क्षेत्राचे प्रमाण कमी आहे.

२२.जिरायत क्षेत्राचे प्रमाण जास्त आहे.

२३.गुळाणीमध्ये सिमेंटने बाद बांधलेल्या पत्राने बांधलेल्या घरांमध्ये पत्रांची छप्पर असणारे घरांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

२४. अन्नधान्यांमध्ये ज्वारीची भाकरी बाजरीची भाकरी गव्हाची चपाती यांचा वापर केला जातो.

२५. घरामध्ये इंधनासाठी गॅस असूनही इतर बाबींचा उपयोग केला जातो.

२६. गुळाणीमध्ये हिंदू धर्माच्या लोकांचे प्रमाण जास्त आहे.

२७. पारंपारिक पद्धतीने अनेक सण साजरे होतात.

२८.शर्ट घालणारे लोकांचे प्रमाण अधिक असून स्त्रियांमध्ये साडी घालणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक आहे.

२९.जास्त लोकांना घरीच पाणीपुरवठा या सोयी उपलब्ध आहेत दहावीपर्यंत मराठी माध्यमाची शाळा आहे याशिवाय रस्ते दवाखाने वीज यांच्या सुविधा आहेत

# ग्रामसर्वेक्षणा दरम्यान टिपलेली छायाचित्रे



फोटो क्र. १ गुळाणीतील वृद्ध आजीची मुलाखत घेताना डॉ. दादासाहेब मारकड



फोटो क्र. 2 गुळाणीतील सटवाजी बाबा मंदिरापुढे सर्वेक्षण करणारे विद्यार्थी, सोबत विभागप्रमुख प्रा.डॉ. दिलीप मुळूक, डॉ. दादासाहेब मारकड आणि मच्छिंद्र मुळूक.



फोटो क्र. 3 सटवाजी बाबाचे मंदिर अंतर्भाग




फोटो क्र. 4 गुळाणीतील सटवाजी बाबा मंदिराजवळील गुलान ओढा




फोटो क्र. 5 गुळाणी गावातील मंदिराच्या अंतर्भागातील सिमेंटी रस्ते




फोटो क्र. 6 गुळाणीतील सटवाजी बाबा मंदिर – बाहेरील दृश्य




फोटो क्र. 7 ग्राम  पंचायत कार्यालय गुळाणी




फोटो क्र. 8 गुळाणीतील जुनी कौलारू घरे





फोटो क्र. 9 गुळाणीतील प्राथमिक आरोग्य केंद्र



फोटो क्र. 10 गुळाणी अंतर्गत रस्ते आणि पडकी घरे




फोटो क्र. 11 जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुळाणी



फोटो क्र. १२ जुना गायकवाड यांचा वाडा गुळाणी




फोटो क्र. १३ कै. बाबुरावजी पिंगळे विद्यालय गुळाणी




फोटो क्र. १४ गुळाणी परिसरातील रस्ता




फोटो क्र. १५ गुळाणीतील सिमेंटने बांधलेली विहीर



फोटो क्र. १६  गुळाणीतील आटलेला पाझर तलाव




फोटो क्र. १७  गुळाणीतील स्मशानभूमी




फोटो क्र. १८  गुळाणीतील बैलगाडा घाट




फोटो क्र. १९ भूगोल विभागातील विद्यार्थिनी गाव सर्वेक्षण करताना



फोटो क्र. 20 गुळाणी गावातील ज्वारीचे खळे



फोटो क्र. २१ गुळाणी पाणी पुरवठा टाकी